पुर रेषेच्या आत कोणतेही बांधकाम न
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
परिपत्रक क्रमांक एफआरएम १०८९/सीआर ३६९८/२६
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक २१ सप्टेंबर १९८९

परिपत्रक :- जुलै ८९ मधील अतिवृष्टी/पुरामुळे राज्यातील ग्रामीण भागातील ब-याच ठिकाणी पूर रेषेच्या आतील घरांची मोठया प्रमाणात पडझड झालेली आहे. सदर घरांच्या पुर्नबांधणीचे काम विविध यंत्रणाकडून हाती घेण्यात आलेली आहे. तथापी अशा प्रकारे होणारे नुकसान टाळण्यासाठी पूर रेषेच्या आत कोणत्याही प्रकारचे बांधकामास परवानगी न देण्याचे शासनाचे धोरण आहे. यानुसार सदर घरांची पुर्नबांधणी करताना ती या पूर रेषेच्या आतील क्षेत्रात असणार नाही याची कृपया दक्षता घ्यावी तसेच नवीन घरे किंवा बांधकामे करताना ती पूर रेषेच्या आत मध्ये असणार नाहीत याची सुध्दा कटाक्षाने काळजी घ्यावी. विशेषः पुर्नवसीत गावठाणाच्या स्थापनेमध्ये व घरबांधणीच्या संदर्भात या सूचनांची नोंद घ्यावी.

उपरोक्त सूचना सर्व संबधितांच्या नजरेस आणून द्याव्यात व त्यांचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सही/-
[ आ.बा. पाटील]
कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग